संत ज्ञानेश्वर शिक्षण संस्था, इस्लामपूर ता. वाळवा जि. सांगली या संस्थेस आष्टा ता. वाळवा जि. सांगली येथे नविन आयुर्वेद महाविद्यालय सुरू करण्यास मान्यता देणे बाबत...

# महाराष्ट्र शासन

## वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग

शासन निर्णय क्र.एएमसी-११९९//सीआर-१०९/९९/शिक्षण-२
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२. दिनांक : ८ ऑक्टोबर, १९९९.

**वाचा :-** १ शासन पत्र वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग क्र. एएमसी-१०९९/ सीआर-१०९/९९/ शिक्षण-२ दि. ७ मे, १९९९.

२ भारतीय चिकित्सा केंद्रीय परिषद नवी दिल्ली यांचे पत्र क्र.३-१४/ ९९-एवाय, (१०४) दि.७.१०.९९

**<u>प्रस्तावना :-</u>** संत ज्ञानेश्वर शिक्षण संस्था, इस्लामपूर ता. वाळवा जि. सांगली या संस्थेस आष्टा ता. वाळवा जि. सांगली येथे नविन आयुर्वेद महाविद्यालय सुरु करण्यास मान्यता देण्यास राज्य शासनाची हरकत नाही असे भारतीय चिकित्सा केंद्रीय परिषद, नवी दिल्ली यांना शासनाने उक्त संदर्भ क्र.१ अन्वये कळविले होते. त्यास अनुसरुन संत ज्ञानेश्वर शिक्षण संस्था, इस्लामपूर ता. वाळवा जि. सांगली या संस्थेस आष्टा ता. वाळवा जि. सांगली येथे नविन आयुर्वेद महाविद्यालय येथे सन १९९९-२००० या शैक्षणिक वर्षापासून ३० विद्यार्थी क्षमतेचे आयुर्वेद महाविद्यालय सुरु करण्यास भारतीय चिकित्सा केंद्रीय परिषद, नवी दिल्ली यांनी उपरोक्त संदर्भ क्र.२ अन्वये मान्यता दिली आहे. भारतीय चिकित्सा केंद्रीय परिषद, नवी दिल्ली यांनी मान्यता दिल्यानुसार या संस्थेस आष्टा ता. वाळवा जि. सांगली येथे आयुर्वेद महाविद्यालय सुरु करण्यास मंजुरी देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन निर्णय :-</u>** शासन या निर्णयाद्वारे, संत ज्ञानेश्वर शिक्षण संस्था, इस्लामपूर ता. वाळवा जि. सांगली या संस्थेस आष्टा ता. वाळवा जि. सांगली येथे सन १९९९-२००० या शैक्षणिक वर्षापासुन ३० विद्यार्थी क्षमतेचे आयुर्वेद महाविद्यालय सुरु करण्यास खालील अटीं व शर्तींच्या अधिन राहून मान्यता देत आहे:-

२/-



PRINCIPAL
Shri Annasaheb Dange Ayurved Medical
llege, Ashta. Tal.Walwa, Dist.Sangli.

अ) संस्थेने त्यांच्या प्रस्तावास महाराष्ट्र आरोग्य विद्यापीठ, नासिक यांची मान्यता मिळवावी.

ब) संस्थेने त्यांच्या संस्थेत, भारतीय चिकित्सा केंद्रीय परिषद नवी दिल्ली यांच्या मानकानुसार आवश्यक त्या शैक्षणिक सुविधांची पुर्तता करावी.

क) सदरहू सस्थेत जे. उन्नीकृष्णण विरुध्द आंध्र प्रदेश शासन व इतर (याचिका क्र. ६०७/९२)या प्रकरणात मा. सवौच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार शासनाच्या सक्षम प्राधिकाऱ्यामार्फत केंद्रिय पध्दतीने प्रवेश करण्यात येतील.

ड) राज्य शासनाने आयुर्वेद अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयाबाबत वेळोवेळी विहीत केलेल्या नियमांचे व मानकांचे पालन करणे संस्थेवर बंधनकारक राहील.

इ) महाराष्ट्र एज्युकेशन इन्स्टिट्यूशन्स ( प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशन फी) ॲक्ट १९८७ (महाराष्ट्र ॲक्ट ६ ऑफ १९८८) मधील तरतूदींचे संस्थेने काटेकोरपणे पालन करणेआवश्यक आहे.

फ) सदरहू संस्थेस कायम विना अनुदान तत्वावर मान्यता देण्यात आली आहे. त्यामुळे संस्थाआवर्ती /अनावर्ती स्वरुपाच्या खर्चासाठी शासनाकडे अनुदानाची मागणी करणार नाही असे लेखी अभिवेदन संस्थेने दिले पाहीजे.

य) भारतीय चिकित्सा केंद्रीय परिषद नवी दिल्ली यांनी विहीत केलेल्या प्रमाणकांचा योग्यरित्या पुर्तता करुन संस्थेने दरवर्षी परिषदेची मान्यता मिळविणे आवश्यक आहे.

र) शासकीय वैद्यकीय किंवा तत्सम महाविद्यालयातील कोणत्याही अध्यापकास तो सेवानिवृत्त होईपर्यंत किंवा नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होईपर्यंत संस्थेमध्ये नोकरी देता येणार नाही किंवा त्याच्या सेवा संस्थेस वापरता येणार नाही.

३/-

PRINCIPAL
Shri. Annasaheb Dange Ayurved Medical
llege, Ashta. Tal.Walwa, Dist.Sangli.

२.      भारतीय चिकित्सा केंद्रीय परिषद नवी दिल्ली यांनी निश्चित केल्यानुसार सदर संस्थेची सन १९९९-२००० या शैक्षिणिक वर्षाकरिता विद्यार्थी क्षमता ४० असेल.

३.      सक्षम प्राधिकारी तथा महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ नासिक यांनी सदरहू संस्थेत सन १९९९-२००० या शैक्षणिक वर्षात प्रवेश करण्याची कार्यवाही करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

(भा.र.गावित)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
मा.राज्यपालांच सचिव, राजभवन, मुंबई.
मा.मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
कुलगुरु, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक.
भारतीय चिकित्सा केंद्रीय परिषद, नवी दिल्ली (पत्राने)
सचिव आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय, भारत सरकार, निर्माण भवन, नवी दिल्ली.
सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय मुंबई.
संचालक आरोग्य सेवा महराष्ट्र राज्य, मुंबई.
संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई.
संचालक, आयुर्वेद संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
सहायक संचालक आयुर्वेद, मुंबई/पुणे/नागपूर.
सर्व आयुर्वेद महाविद्यालये, महाराष्ट्र राज्य.
प्राचार्य, संत ज्ञानेश्वर शिक्षण संस्था, आष्टा ता. वाळवा जि. सांगली.
मा.मंत्री (वै.शि.) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
सर्व उपसचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई.
निवडनस्ती (शिक्षण-२)

PRINCIPAL
Shri Annasaheb Dange Ayurved Medical
llege, Ashta. Tal.Walwa, Dist.Sangli.